महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी प्रवेशासाठी जागांचे सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, जागा वाटपाची व प्रवेश प्रक्रियेची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णय / शासन शुध्दीपत्रकाचे एकत्रीत करणे तसेच आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : मपवि-२०१९/प्र.क्र.३१/ माफसू
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक- ११ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. मपवि-२०१२/प्र.क्र.३२/पदुम-१, दिनांक ११ जून, २०१३
२) शासन शुध्दीपत्रक, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. मपवि-२०१४/प्र.क्र.४३/म्हापसू, दिनांक १८ जून, २०१४
३) शासन शुध्दीपत्रक, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. मपवि-२०१४/प्र.क्र.३२/पदुम-१, दिनांक १५ जून, २०१६
४) केंद्र शासनाचा अपंग व्यक्तीचा अधिकार अधिनियम २०१६ मध्ये दिनांक २८ डिसेंबर, २०१६ ची सुधारणा
५) भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र. एफ. नं. इडीएन/१(१७)/२०१२, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१७
६) शासन निर्णय, महिला व बालकल्याण विकास विभाग, क्र. अमुजा २०११ / प्र.क्र.२१२ /का-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९
८) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे क्र. मपमविवि/विद्या/ शा.नि. /१८/४६२/२०१९ नागपूर, दिनांक ०३ मे, २०१९.
९) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी- २०१८/प्र.क्र.६३१ अ/ १६-अ, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९

<u>प्रस्तावना-</u>

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी प्रवेशासाठी जागांचे सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, जागा वाटपाची व प्रवेश प्रक्रियेची कार्यपध्दती संदर्भाधीन अनु. क्र. १ येथील दिनांक ११ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानंतर संदर्भाधीन अनु.क्र. २

येथील दिनांक १८ जून, २०१४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये उक्त दिनांक ११ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. अ) मधील मुद्दा क्र. ४ तसेच सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट २ मधील मुद्दा क्र. (५) व (८) मध्ये अल्पशा सुधारणा करण्यात आल्या आहेत.

२. तसेच संदर्भाधीन अनु.क्र. ३ येथील दिनांक १५ जून, २०१६ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये उक्त दिनांक ११ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. क) मधील मुद्दा क्र. ५), ६), ७) मध्ये कांही सुधारणा केलेल्या आहेत.

३. तसेच केंद्र शासनाने लक्षणीय अपंगत्व असलेल्या व्यक्तींचे आरक्षण ३ टक्क्यावरुन ५ टक्के असे केलेले आहे. राज्य शासनाने अनाथ मुलांसाठी १ टक्का, आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या घटकांसाठी १० टक्के व मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गासाठी १२ टक्के आरक्षण अनुज्ञेय केलेले आहे. या सर्व बाबी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागू करणे आवश्यक आहे.

४. वर नमूद परिच्छेद क्र. १ व २ मध्ये नमूद केलेल्या तरतुदी एकत्रीत नसल्याने प्रवेश प्रक्रियेबाबतची कार्यवाही करतांना सक्षम प्राधिकाऱ्यास अनेक अडचणी निर्माण होतात. तसेच प्रवेशासंदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्भवू शकतात. या सर्व बाबी विचारात घेता संदर्भाधीन शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रकांमधील सर्व महत्वाच्या तरतूदी एकत्रीत करुन त्या एकाच आदेशात नमूद केल्या तर कार्यवाही करतांना सुलभ जाईल. त्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने सर्व शासन निर्णय/शासन शुध्दीपत्रक एकत्रीत तरतुदी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्यांचे संकलन करणे तसेच उक्त परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने आवश्यक ते आदेश निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुसार प्रवेश प्रक्रिया संबंधी शासन निर्णय दिनांक ११ जून, २०१३ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भाधीन सर्व शासन शुध्दीपत्रकांचे एकत्रीकरण करुन त्याचप्रमाणे उक्त परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेवून सर्वसमावेशक शासन निर्णय पुढील प्रमाणे निर्गमीत करण्यात येत आहे :-

शासन निर्णय :-

५. संदर्भाधीन शासन निर्णय /शुध्दीपत्रकांमधील आदेशांचे एकत्रिकरण करतांना मूळ तरतुदी विचारात घेण्यात आलेल्या आहेत. त्यामूळे प्रवेश प्रक्रिया राबवितांना काही अडचणी उद्भवल्यास उपरोक्त संदर्भाधीन मूळ शासन निर्णय / शुध्दीपत्रकातील तरतुदींचे अवलोकन करावे.

६. राज्यातील कृषि विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांसाठी अवलबंण्यात येत असलेली प्रवेश प्रक्रिया, भारतीय कृषि अनुसंधान परिषद व भारतीय चिकित्सा परिषद यांनी विहीत केलेले नियम इत्यादी बाबी विचारात घेवून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरळीत होण्याच्या दृष्टीने

सामाजीक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश प्रक्रियेची कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चीत करण्यात येत आहे.

७.(अ) पशुवैद्यकीय, दुग्धतंत्रज्ञान व मत्स्यविज्ञान या विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या जागांचे वाटप

(i) पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटयानुसार प्रवेश क्षमतेच्या अनुक्रमे ३०:७० याप्रमाणे विभागणी करुन करण्यात यावी.

(ii) राज्यात दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या विद्याशाखेतील महाविद्यालयांची संख्या व विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता कमी आहे. त्यामुळे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया फक्त राज्यस्तरीय कोटयाप्रमाणे करण्यात यावी.

(iii) पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांसाठी मंजूर प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा भारतीय पशु चिकित्सा परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून भरण्यासाठी राखीव ठेवण्यात याव्यात व सदर जागा त्यांचे माध्यमातून भरण्यात याव्यात.

(iv) दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या पदवी अभ्यासक्रमांसाठी मंजूर प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून भरण्यासाठी राखीव ठेवण्यात याव्यात व सदर जागा त्यांचे माध्यमातून भरण्यात याव्यात.

(v) उक्त (iii) व (iv) मध्ये नमूद केलेल्या जागा रिक्त राहिल्यास, सदर जागा विद्यापीठाच्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधून विहीत मार्गाने अर्ज करणाऱ्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात.

(vi) अनिवासी भारतीय / विदेशी नागरीक / भारतीय वंशाचे विदेशी नागरीक असलेल्या उमेदवाराकरिता उक्त पशुवैद्यकीय (बी.व्ही.एस्सी.ॲन्ड ए.एच./एम.व्ही.एस्सी./ आचार्य पदवी), दुग्ध तंत्रज्ञान (बी.टेक.) आणि मत्स्य विज्ञान (बी.एफ.एस्सी.) या विद्याशाखेतील अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमते व्यतिरीक्त प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता १० जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

सदर उमेदवारांचे अर्ज संक्षिप्त माहितीसह तसेच इतर सर्व आवश्यक त्या कागदपत्रासह भारतातील त्यांच्या राजदूत कार्यालयामार्फत, सहाय्यक निर्देशक सामान्य, शिक्षण विभाग (HRD), भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली -११० ०१२ किंवा अवर सचिव, भारत सरकार (DARE), नवी दिल्ली -११० ००१ किंवा प्रमुख (Placement & Secondment), भारतीय शैक्षणीक सल्लागार लिमीटेड, १८-ए, सेक्टर १६-ए, नोएडा -२०१ ३०१ (भारत) यांच्या मार्फत स्विकारण्यात यावेत व त्यांचे प्रवेश विद्यापीठ विहीत करेल, असे विशेष शुल्क आकारुन विद्यापीठामार्फत प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

(vii) उक्त (vi) मध्ये नमूद केलेल्या जागा रिक्त राहिल्यास, राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात. सदर उमेदवारांकडून अनिवासी भारतीय उमेदवारांना लागू असलेले प्रवेश शुल्क आकारण्यात यावे.

(viii) गोवा राज्यातील उमेदवारांकरिता पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमते व्यतिरीक्त जास्तीत जास्त ६ जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

विद्यापीठाने विहीत केलेल्या नियमाप्रमाणे गोवा राज्यासोबत करण्यात आलेल्या आंतरराज्य सामंजस्य करारा नुसार प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रवेशाकरिता प्रवेश शुल्का व्यतिरिक्त विद्यापीठ विहीत करेल, असे विशेष शुल्क आकारुन त्यांना विद्यापीठामार्फत प्रवेश देण्याची कार्यवाही करावी. सदर उमेदवारांचे अर्ज गोवा राज्य शासनाने प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फतच स्विकारण्यात यावेत.

(ix) या विभागाच्या शासन निर्णय क्र. अेजीयु - २०९५/२३१०६/प्र.क्र. १८१/ १९ अे, दिनांक ०५ सप्टेंबर, १९९६ आणि क्र. अेजीयु - ११९७/२८६८८/प्र.क्र. ९४/ ९७/१९ अे, दिनांक २७ आक्टोबर, १९९७ या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या धोरणानुसार जम्मू व काश्मिर राज्यातील उमेदवारांकरिता पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या तीनही विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमते व्यतिरीक्त प्रत्येकी १ जागा महाविद्यालय निहाय राखीव ठेवण्यात यावी.

सदर उमेदवारांचे अर्ज जम्मू व काश्मिर राज्यतील तहसीलदार, पुनर्विकास विभाग, जम्मू व काश्मिर यांच्यामार्फतच स्विकारण्यात यावेत.

(ब) पशुवैद्यकीय, दुग्धतंत्रज्ञान व मत्स्यविज्ञान या विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या जागांचे वाटप

(i) पशुवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटयानुसार प्रवेश क्षमतेच्या अनुक्रमे ५०:५० याप्रमाणे विभागणी करुन करण्यात यावी.

(ii) आचार्य पदवी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता कमी असल्यामुळे या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया फक्त राज्यस्तरीय कोटयाप्रमाणे करण्यात यावी.

(iii) पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी या अभ्यासक्रमांसाठी मंजूर प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून भरण्यासाठी राखीव ठेवण्यात याव्यात व सदर जागा त्यांचे माध्यमातून भरण्यात याव्यात.

(iv) उक्त (iii) मध्ये नमूद केलेल्या जागा रिक्त राहिल्यास, सदर जागा विद्यापीठाच्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधून विहीत मार्गाने अर्ज करणाऱ्या गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात.

(v) दुग्धतंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान पदव्युत्तर पदवी त्याचप्रमाणे आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता कमी असल्यामुळे या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया फक्त राज्यस्तरीय कोटयाप्रमाणे करण्यात यावी

८. पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी या अभ्यासक्रमासाठी सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी विहीत केलेल्या आरक्षणानुसार जागांचे वाटप

(i) पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी वरील प्रमाणे राखीव ठेवलेल्या जागा वगळून, उर्वरित जागा खाली निर्देशित केलेल्या टक्केवारीनुसार संबंधीत मागास प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात याव्यात.

अ.क्र	प्रवर्ग	टक्केवारी
१	अनुसूचित जाती (एस.सी.)	१३
२	अनुसूचित जमाती (एस.टी.)	०७
३	विमुक्त जाती (अ) (व्ही.जे.-ए)(१४ व इतर)	०३
४	भटक्या जमाती (ब) (एन.टी.-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर)	२.५
५	भटक्या जमाती (क) (एन.टी.-सी)	३.५
६	भटक्या जमाती (ड) (एन.टी.-डी)	०२
७	इतर मागास वर्गीय (ओ.बी.सी.) व विशेष मागास प्रवर्गातील पूर्वी इतर मागास वर्गात समाविष्ट जाती	१९
८	मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग (एसईबीसी)	१२
९	खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक	१०
	एकुण	७२

(ii) सामाजिक आरक्षणांतर्गत संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/ तांशि-१, दि.११/०७/१९९७ मधील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंतच्या जागा **"विशेष मागास प्रवर्ग"** या प्रवर्गातील उमेदवारांसाठी प्रथम उपलब्ध करुन देण्यात याव्यात. (सोबतच्या परिशिष्ट - २ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दती प्रमाणे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.)

(iii) उक्त (ii) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल ०२ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर, जर आणखी जागा रिक्त राहिल्यास, तर त्या जागा इतर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरळमिसळ करुन भरण्यात याव्यात.

(iv) वर नमूद केलेल्या प्रवर्गनिहाय आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी खालील प्रमाणे समांतर आरक्षण ठेवण्यात यावे व त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

अ. क्र.	संवर्ग	टक्केवारी
१	महिलांकरीता	३०
२	शेतकरी व शेत मजुरांची मुले	६
३	महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ अन्वये प्रकल्पामुळेविस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले प्रकल्पबाधित.(पीएपी)	४
४	अपंग (पी.एच.) - भारतीय पशुचिकित्सा परिषदेने ठरवून दिलेल्या मानकानुसार, - (१) संपूर्ण शरीराची विकलांगता ज्यामध्ये छाती व मणक्यांची विकलांगता ५० टक्केपेक्षा जास्त नसावी (Disability of total body including disability of Chest/Spine not more than ५०%) (२) शरीराच्या कंबरेच्या खालील भागाची विकलांगता ५० टक्केपेक्षा जास्त नसावी (Disability of Lower Limb not more than ५०%) (३) शरीराच्या कंबरेच्या वरील भागाची विकलांगता नसावी (Disability of Upper Limb). (४) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी किंवा श्रवण शक्तीतील दोष नसावे. (No Blindness or low vision or hearing impairment) (५) उत्तरोत्तर वाढत जाणारा स्नायुंचा आजार नसावा. (Not progressive disease like myopathies etc.) (६) कर्तव्य व जबाबदारीमध्ये अडथळा निर्माण होईल असे अपंगत्व / आजार नसावेत (Not Interfere in the performance of duties and responsibilities)	५
५	स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य (एफ.एफ.)	२
६	आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी)	२
७	खुल्या प्रवर्गातील जागांमधून अनाथ मुलांकरीता (ओसी)	१

(v) खुल्या असलेल्या जागा व सामाजिक आरक्षित प्रवर्गामध्ये समांतर आरक्षण नमूद टक्केवारीनुसार समाविष्ट राहतील.

९. **पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्र :-**

उक्त विद्याशाखेतील प्रवेशासाठी ज्या दिनांकास अर्ज केला असेल त्या दिनांका लगतपुर्वीच्या १० वर्ष मुदतीमध्ये किमान ३ वर्षे उमेदवार किंवा त्याचे पालक यांनी महाराष्ट्र राज्यात निवास केलेला असेल, तर अशा उमेदवारास महाराष्ट्र राज्यातील उमेदवार म्हणून प्रवेशास पात्र समजण्यात यावे. सदर उमेदवाराचे वास्तव्य तथा अधिवास दर्शविणारे सक्षम प्राधिकरणाचे खालीलपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात यावा :-

(i) उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातून दहावी, अकरावी व बारावी अथवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र.

(ii) उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातून पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र.

(iii) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले अधिवास / प्रवेशासाठी अर्ज केला त्या दिनांका लगत पुर्वीच्या १० वर्षामध्ये किमान ३ वर्षाचे महाराष्ट्रातील वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे रहिवाशी प्रमाणपत्र.

(iv) जन्म ठिकाणाची नोंद असलेला/ शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला

१०. राज्याबाहेरील उमेदवारांकरीता (Out of States) किंवा राज्यातील उमेदवारांने उक्त विद्याशाखेतील प्रवेशासाठी ज्या दिनांकास अर्ज केला असेल त्या दिनांका लगतपुर्वीच्या १० वर्ष मुदतीमध्ये किमान ३ वर्षे त्या उमेदवार किंवा त्याच्या पालकांनी महाराष्ट्र राज्यात निवास केलेला नसेल, अशा उमेदवारांकरीता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमतेच्या २ टक्के जागा राज्यस्तरीय कोटयात खुल्या जागेमधून राखीव ठेवण्यात याव्यात. सदर उमेदवारांना, विद्यापीठ विहीत करेल, असे विशेष शुल्क आकारुन विद्यापीठामार्फत प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

सदर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असतांना उमेदवार किंवा त्याचे पालक यांचे इतर राज्यातील वास्तव्य अथवा अधिवास दर्शविणारे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र अथवा जन्म ठिकाणाची नोंद असलेल्या शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला तसेच जन्माचा दाखला ग्राहय धरण्यात यावा.

११. उमेदवाराने उच्च माध्यमिक शालांत (१०+२) परीक्षा किंवा पशुवैद्यकीय पदवी परीक्षा इतर राज्यातून उत्तीर्ण केलेली असेल व सदर उमेदवारांचे पालक महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असतील, तर त्याला अनुक्रमे पशुवैद्यकीय पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता फक्त राज्यस्तरीय कोटयासाठी पात्र ठरविण्यात यावे.

परंतु, उक्त उमेदवारांकडून प्रवेशासाठी ज्या दिनांकास अर्ज केला असेल त्या दिनांका लगतपुर्वीच्या १० वर्ष मुदतीमध्ये किमान ३ वर्षे उमेदवारच्या पालकांनी महाराष्ट्र राज्यात निवास केला असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र पुरावा म्हणून घेण्यात यावे.

१२. वरील तीनही विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी या अभ्याक्रमांच्या प्रवेशासाठी सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये विहीत केल्याप्रमाणे सामाजिक आरक्षण व त्यानुसार जागा वाटपाची कार्यपध्दती आणि **परिशिष्ट- २** मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१३. केंद्रीय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे / विहीत करण्याचे तसेच प्रवेशासाठी गुणाधिभार / अतिरिक्त गुण (Weightage) देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचे आणि विद्यापीठांतर्गत सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावली व शैक्षणिक व इतर शुल्क निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील तरतुदीनुसार विद्यापीठास राहतील.

तथापि, शिक्षण शुल्क (Tution Fee) व वसतिगृह शुल्क शासनाच्या पूर्व मान्यतेने निश्चित करुन त्याची अंमलबजावणी विद्यापीठाकडून करण्यात यावी.

१४. या शासन निर्णयातील तरतुदी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षा पासून अंमलात येईल.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१११३२०४७०९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b
19d45ef776d80ef148059, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=406cb152e109154a7466c0050f88e5a437e178
38973824687653a5e8d144b72b, ou=AGRI AND ADF
DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=VIKAS TULSHIRAM KADAM
Date: 2019.07.11 13:26:21 +05'30'

(विकास तु. कदम)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
४. शिक्षण संचालक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
५. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
६. नियंत्रक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
७. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा. मंत्री (पदुम) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
९. मा. राज्यमंत्री (पदुम) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
११. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
१२. उप सचिव (पसं), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
१३. निवड नस्ती (माफसू).

(शासन निर्णय क्र. मपवि-२०१९/प्र.क्र.३१/माफसू सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट - १

सामाजिक आरक्षण व त्यानुसार जागा वाटपाची कार्यपध्दती

१ पशुवैद्यकीय या विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमासाठी भारतीय पशु चिकित्सा परिषद, नवी दिल्ली/ भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून भरण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागा वगळून, उर्वरीत जागा "राज्य" व "विभागीय" कोटयातून भरण्यात याव्यात. तसेच, दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान या विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून भरण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागा वगळून, उर्वरीत जागा "राज्यस्तरीय कोटयातून भरण्यात याव्यात. "राज्य" व "विभागीय" कोटयातील जागांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता दरवर्षी स्वतंत्रपणे विद्यापीठ / महाविद्यालय निहाय शासनाने विहीत केलेल्या सामाजिक व समांतर आरक्षणाच्या धोरण व टक्केवारीनुसार जागांचे वाटप करण्यात यावे.

२ ज्या सामाजिक प्रवर्गाना आरक्षणाची टक्केवारी कमी आहे, अशा प्रवर्गांना कमी प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालयामध्ये वर्षानुवर्षे जागा उपलब्ध होत नाहीत. पर्यायाने असे उमेदवार या अभ्यासक्रमापासुन वंचित राहतात. त्यामुळे भविष्यात सेवा भरती करतांना अशा प्रवर्गातील उमेदवारच उपलब्ध होणार नाहीत. त्यासाठी आरक्षित जागा सामाजिक मागास प्रवर्गाकरिता उपलब्ध करुन, यापैकी ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना त्यांच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध होतात, अशा जागा (सामाजिक मागास प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध झालेला प्रवर्ग वगळुन) ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना कमी टक्केवारीमुळे जागा उपलब्ध होत नाहीत, अशा सामाजिक मागास प्रवर्गांना "जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य" या तत्वावर क्रमवारीने (By Rotation) दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, एसईबिसी व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गाना जागा उपलब्ध होत नसल्यास, या प्रवर्गाना त्यांच्या टक्केवारीचे जादा प्रमाण विचारात घेऊन म्हणजेच इतर मागास वर्ग (१९ टक्के), अनुसूचित जाती (१३ टक्के), एसईबिसी (१२ टक्के), खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (१० टक्के), अनुसूचित जमाती (७ टक्के), भटक्या जमाती (क) (३.५ टक्के), विमुक्त जाती (अ) (३ टक्के), भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के), भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा क्रमवारीने दरवर्षी जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यामुळे सर्व

प्रवर्गांना न्याय मार्गाने जागा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. यासाठी पुढीलप्रमाणे उदाहरणासह स्पष्ट करण्यात आले आहे.

(१) **१० प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालयात जागांचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.**

प्रवर्ग	आरक्षणाची टक्केवारी	टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या	टक्केवारीची संख्या पूर्णांकात करुन वाटप करावयाच्या जागा
अनुसूचित जाती	१३	१.३	१
अनुसूचित जमाती	०७	०.७	१
विमुक्त जाती (अ)	०३	०.३	०
भटक्या जमाती (ब)	२.५	०.३	०
भटक्या जमाती (क)	३.५	०.४	०
भटक्या जमाती (ड)	०२	०.२	०
इतर मागासवर्गीय	१९	१.९	२
एसईबिसी	१२	१.२	१
खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक	१०	१.०	१
उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी (अनारक्षित)			४

वरीलप्रमाणे विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. तसेच सामाजिक आरक्षणासाठी ६० टक्के व खुल्या प्रवर्गासाठी ४० टक्के जागा उपलब्ध होतात. त्यामुळे ७२ टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ही बाब विचारात घेऊन एकुण जागांपैकी एक जागा विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना "जादा" "टक्केवारीस प्रथम प्राधान्य" या तत्वावर वाटप करण्यात यावी.

म्हणजेच पहिले वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के)

दुसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के)

तिसरे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के)

चौथे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर -

पाचव्या वर्षापासुन पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(२) ७ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालयात जागांचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

प्रवर्ग	**आरक्षणाची टक्केवारी**	**टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या**	**टक्केवारीची संख्या पूर्णांकात करुन वाटप करावयाच्या जागा**
अनुसूचित जाती	१३	०.९१	१
अनुसूचित जमाती	०७	०.४९	०
विमुक्त जाती (अ)	०३	०.२१	०
भटक्या जमाती (ब)	२.५	०.१८	०
भटक्या जमाती (क)	३.५	०.२५	०
भटक्या जमाती (ड)	०२	०.१४	०
इतर मागासवर्गीय	१९	१.३३	१
एसईबिसी	१२	०.८४	१
खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक	१०	०.७०	१
उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी (अनारक्षित)			३

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत, एकूण ७२ टक्के आरक्षण विचारात घेता उक्त ७ जागांचा विचार करता आरक्षित प्रवर्गांना ५.०४ आणि खुल्या प्रवर्गात १.९६ जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अशाप्रकरणी २ जागा खुल्या प्रवर्गासाठी आणि ५ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गांमध्ये इतर मागासप्रवर्ग, एसईबिसी, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अनुसूचित जाती या प्रवर्गांना टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप होत असल्याने उर्वरित पाचवी जागा “जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य” या तत्वावर वाटप करण्यात यावी.

म्हणजेच पहिले वर्ष अनुसूचित जमाती (७ टक्के)

दुसरे वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के)

तिसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के)

चौथे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के)

पाचवे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर -

सहाव्या वर्षापासुन पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(३) ३ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालयात जागांचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

प्रवर्ग	आरक्षणाची टक्केवारी	टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या	टक्केवारीची संख्या पूर्णांकात करुन वाटप करावयाच्या जागा
अनुसूचित जाती	१३	०.३९	०
अनुसूचित जमाती	०७	०.२१	०
विमुक्त जाती (अ)	०३	०.०९	०
भटक्या जमाती (ब)	२.५	०.०८	०
भटक्या जमाती (क)	३.५	०.११	०
भटक्या जमाती (ड)	०२	०.०६	०
इतर मागासवर्गीय	१९	०.५७	१
एसईबिसी	१२	०.३६	०
खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक	१०	०.३०	०
उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी (अनारक्षित)			२

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), एसईबिसी व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत, याच बरोबर ७२ टक्के आरक्षण निर्धारीत होत नाही. ७२ टक्के आरक्षण विचारात घेता आरक्षित प्रवर्गांना २.१६ आणि खुल्या प्रवर्गास ०.८४ जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अशाप्रकरणी १ जागा खुल्या प्रवर्गासाठी आणि २ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गांमध्ये इतर मागासप्रवर्ग या प्रवर्गांला टक्केवारीनुसार एक जागेचे वाटप होत असल्याने उर्वरित एक जागा “जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य” या तत्वावर वाटप करण्यात यावी.

म्हणजेच पहिल्या वर्षी अनुसूचित जाती (१३ टक्के)

दुसऱ्या वर्षी एसईबिसी (१२ टक्के)

तीसऱ्या वर्षी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (१० टक्के)

चौथ्या वर्षी अनुसूचित जमाती (०७ टक्के)

पाचव्या वर्षी भटक्या जमाती (क) (३.५ टक्के)

सहाव्या वर्षी विमुक्त जाती (अ) (३ टक्के)

सातव्या वर्षी भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के)

आठव्या वर्षी भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

टीप – उपरोक्त उदाहरणे दर्शविलेल्या सम व विषम संख्यांनाच लागू नसून त्यापूढील सर्व सम व विषम संख्याबाबतदेखील लागू राहील.

(शासन निर्णय क्र. मपवि-२०१९/प्र.क्र.३१/ माफसू सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट - २

प्रवेश प्रक्रिया कार्यपध्दती

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी खुल्या व सामाजिक मागास प्रवर्गाचा प्राधान्यक्रम व रिक्त जागांच्या रुपांतरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे :-

(१) राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटयातील जागांवर प्रवेश देण्यासाठी पुढील क्रम अवलंबिण्यात यावा :-

(i) राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटयातील खुल्या प्रवर्गातील जागा प्रथम निव्वळ गुणवत्तेच्या आधारावर, परंतु समांतर आरक्षण विचारात घेवून प्राधान्याने भरण्यात याव्यात.

(ii) राज्याबाहेरील उमेदवारांना (ओ. एस.) आरक्षण टक्केवारी व गुणवत्तेनुसार राज्यस्तरीय कोटयामध्ये स्वतंत्रपणे खुल्या प्रवर्गातील जागांमधून प्रवेश देण्यात यावा.

(iii) राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटयातील गुणवत्तेनुसार आरक्षित प्रवर्गातील जागा गुणवत्तेच्या आधारावर, परंतु समांतर आरक्षण विचारात घेवून प्राधान्याने भरण्यात याव्यात.

(२) समांतर आरक्षणाचा लाभ देण्याचा प्राध्यान्यक्रम संबंधित कोटयामधून (राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटा) खालीलप्रमाणे निश्चीत करण्यात यावा :-

(अ) शेतकरी व शेतमजुरांची मुले (अे.जी.)

(ब) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदींप्रमाणे प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले (पी.अे.पी.)

(क) अपंग :- सदर आरक्षणा अंतर्गत येत असलेल्या एकूण जागा अंधत्व किंवा क्षीणदृष्टी, श्रवण शक्तीतील दोष, चलनवलन विषयक विकलांगता यामधून स्वतंत्रपणे राज्य / विभाग स्तरावराचे प्रवेश २०:४०:६०:८०:१०० या बिंदू प्रमाणे भरावेत. जर सदर उमेदवार भारतीय पशुचिकित्सा परिषदेने ठरवून दिलेल्या खालील मानकानुसार पात्र असेल, तर त्यांचे प्रवेश संबधीत प्रवर्गांतर्गत दर्शविण्यात यावा.

(१) संपूर्ण शरीराची विकलांगता ज्यामध्ये छाती व मनक्याची विकलांगता ५० टक्केपेक्षा जास्त नसावी. (Disability of total body including disability of Chest/Spine not more than ५०%)

(२) शरीराच्या कंबरेच्या खालील भागाची विकलांगता ५० टक्केपेक्षा जास्त नसावी. (Disability of Lower Limb not more than ५०%)

(३) शरीराच्या कंबरेच्या वरील भागाची विकलांगता. (Disability of Upper Limb)

(४) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी किंवा श्रवण शक्तीतील दोष. (Blindness or low vision or hearing impairment)

(५) उत्तरोत्तर वाढत जाणारा स्नायुंचा आजार. (Progressive disease like Myopathies etc.)

(६) कर्तव्य व जबाबदारीमध्ये अडथळा निर्माण होईल असे अपंगत्व / आजार. (Interfere in the performance of duties and responsibilities) (पीएच)

(ड) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य (एफ.एफ.)

(इ) आजी व माजी सैनिकांची मुले (डी.पी.)

(ई) अनाथ मुले (ओ.सी.) केवळ खुल्या प्रवर्गामधून भरण्यात यावेत.

(३) "राज्यस्तरीय व विभागस्तरीय" कोटयातील प्रथम फेरीत संबधित प्रवर्गाचा, समांतर आरक्षणांतर्गत उमेदवार उपलब्ध नसल्यास, सदर रिक्त असलेल्या जागा, प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत खालील प्रमाणे रुपांतरित करण्यात याव्यात :-

(अ) "राज्यस्तरीय व विभागस्तरीय" कोटयातील प्रथम फेरीत रिक्त असलेल्या जागा संबधित प्रवर्गातून भरण्यात याव्यात. तद्नंतर

(ब) संबधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा महिलांसाठी राखीव असलेल्यांपैकी रिक्त जागा, संबधित कोटयामधुन "राज्यस्तरीय व विभागस्तरीय" त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांसाठी स्वतंत्रपणे रुपांतरीत करण्यात याव्यात. तद्नंतर

(क) राज्यस्तरीय व विभागीय कोटयातील खुल्या व सामाजिक प्रवर्गातील जागांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा आरक्षित जागा राज्यस्तरीय व विभागीय कोटयात खुल्या व सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांमधुन गुणवत्तेनुसार स्वतंत्रपणे भरण्यात याव्यात. तद्नंतर

(ड) सामाजिक आरक्षणांतर्गत संबधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टीईएम ३३९७ / १२९२६ (९०८६)/ तांशि-१, दि.११/७/१९९७ नुसार, संबधित महाविद्यालयाच्या / केंद्राच्या एकुण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्यांपर्यंतच्या जागा "विशेष मागास प्रवर्गा" च्या उमेदवारांसाठी प्रथम उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तद्नंतर

(इ) वरील "ड" प्रमाणे २ टक्क्यांपर्यंतच्या जागांवर प्रवेश दिल्यानंतर सामाजिक प्रवर्गामध्ये जागा रिक्त असल्यास, त्या जागांची संबधित कोटयामध्ये (राज्यस्तरीय व विभागस्तरीय कोटा) इतर सर्व सामाजिक आरक्षणांतर्गत सरमिसळ करुन आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार रिक्त जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तद्नंतर

(ई) सामाजिक प्रवर्गामध्ये जागांची सरमिसळ करुनही रिक्त असलेल्या जागा तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागांची सरत शेवटी सरमिसळ करुन राज्याबाहेरील उमेदवार वगळुन (ओ. एस.) राज्य व विभागनिहाय गुणवत्तेनुसार स्वतंत्रपणे भरण्यात याव्यात.

(४) प्रवेशा संबधीचे कोणत्याही आरक्षित जागा रिक्त राहिल्यास, पुढील वर्षाकरीता राखीव ठेवण्यात येवु नये अथवा सदर आरक्षण वर्ग करण्यात येवु नये.

(५) "राज्यस्तरीय व विभागस्तरीय" कोटयातील नियोजीत प्रवेश फेऱ्या संपल्यानंतर रिक्त असलेल्या जागा अथवा विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यानंतर रिक्त होणाऱ्या जागा विद्यापीठाने एक विशेष प्रवेश फेरी आयोजीत करुन राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील उमेदवारांमधून रिक्त असलेल्या संबंधीत प्रवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात.

(६) "राज्यस्तरीय व विभागस्तरीय" कोटयामधुन एकदा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्या वर्षीच्या पुढील प्रवेश फेरीतुन बाद समजण्यात यावे.

(७) नियोजीत प्रवेश फेरीच्या दिनांकास उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांची सुध्दा नोंदणी घेण्यात यावी. तसेच त्यावेळी जागा रिक्त असल्यास त्याला राज्यस्तरीय किंवा विभागस्तरीय गुणवत्ता यादी नुसार त्याचे क्रमावर प्रवेशाकरीता बोलविण्यात यावे.

(८) प्रवेश क्षमतेपेक्षा वर विशेष राखीव ठेवण्यात आलेल्या जागा (जम्मु व काश्मिर व गोवा राज्य) रिक्त असल्यातरी व त्या जागेवर विद्यार्थ्यांनी मागणी केली तरी त्या जागांवर प्रवेश देता येणार नाही.

पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमातील विषयांचे वाटप :

पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये विद्याशाखेबरोबरच विशिष्ट विषयास प्रवेश देण्यात येतात. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयाकरीता राखुन ठेवण्यात आलेले विषय वगळुन उर्वरित जागांचे "राज्यस्तरीय" कोटा व "विभागस्तरीय" कोटा विषयनिहाय जागांचे आरक्षण व वाटप ५०:५० प्रमाणे खालीलप्रमाणे करण्यात यावे.

(१) खुला आणि सामाजिक आरक्षित प्रवर्गाकरिता संबधित महाविद्यालयामध्ये "अनारक्षित वर्ग" आणि "आरक्षित वर्ग" अशा दोनप्रकारे व विषयनिहाय वाटप करण्यात यावे.

(२) विषयाच्या जागा, विषम संख्येत असल्यास "अनारक्षित वर्ग" आणि "आरक्षित वर्गास" प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये आळीपाळीने सम व विषम प्रमाणात विषयांचे वाटप करण्यात यावे.

(३) (i) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्याशाखांमधील महाविद्यालयनिहाय व विषयनिहाय सामाजिक आरक्षण निश्चित करुन वाटणी केल्यानंतर, सामाजिक आरक्षित प्रवर्गांना विषयांचे / महाविद्यालयाचे प्रवेश करण्यासाठी प्रत्येक विद्याशाखेकरिता स्वतंत्र बिंदु नामावलीचा वापर करावा.

(ii) सदर बिंदु नामावली पुढील शैक्षणीक वर्षामध्ये क्रमशः पुढे वापरण्यात यावी.

(४) पदवी अभ्यासक्रमाच्या राज्यस्तरीय व विभागीय कोटयाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेनुसार सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावे.

(५) आचार्य पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता स्वतंत्र बिंदुनामावलीद्वारे विषयाचे प्रवेश करण्यात यावे.

(६) सर्व अभ्यासक्रमाच्या अंतीम प्रवेश फेरीत रिक्त असलेल्या जागा त्याच फेरीत विद्यापीठाच्या गुणवत्तायादीत असलेले इतर राज्यातील उमेदवारांना विद्यापीठ ठरवेल ते विशेष शुल्क आकारुन भरण्यात याव्यात.

(७) ज्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य व विभागीय स्तरानुसार होत असेल त्या अभ्यासक्रमाच्या राज्यस्तरीय प्रवेश फेरीदरम्यान उमेदवार ज्या विभागातुन उत्तीर्ण झालेला असेल त्याला त्या विभागातील महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येणार नाही. सदर उमेदवाराला स्वतःचा विभाग सोडुन इतर विभागातील महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्यात यावा.